## जनसंपर्क विभाग

जळगाव दि. ९ प्रतिनिधी ( ) : **कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठात आयोजित करण्यात आलेला एकविसाव्या महाराष्ट्र राज्य आंतरविद्यापीठ इंद्रधनुष्य युवक महोत्सवाचा समारोप मोठ्या थाटात पार पडला. सलग पाच दिवस चालल्या या महोत्सवात सादर करण्यात आलेल्या विविध कला प्रकारातील स्पर्धांचा निकाल जाहीर करण्यात आला असून. सर्वसाधारण विजेतेपद मुंबई विद्यापीठ, मुंबई या संघाने श्री राधाबाई वसंतराव रांगणेकर सर्वसाधारण विजेता फिरते चषक (श्री विनायक दळवी पुरस्कृत) पटकविला. तर उपविजेतेपद शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर या संघाने श्री चंद्रकांत यशवंत बांदेकर सर्वसाधारण उप विजेता फिरते चषक (श्री आदेश बांदेकर पुरस्कृत) पटकाविला. तसेच या महोत्सवात उत्कृष्ट विद्यार्थी (गोल्डन बॉय) कलावंत म्हणून मुंबई विद्यापीठाचे हर्ष नकाशे तर निधी खाडीलकर ही विद्यार्थिनी कलावंत (गोल्डन गर्ल) म्हणून विजेते ठरले. दरम्यान मान्यवरांच्या उपस्थितीत टाळयांच्या गजरात पारितोषिक वितरण करण्यात आले.**

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी कुलगुरू प्रा.व्ही.एल. माहेश्वरी तर प्रमुख अतिथी म्हणून जळगाव जिल्ह्याचे जिल्हाधिकारी रोहन घुगे, प्रसिध्द मराठी पार्श्वगायक आदर्श शिंदे उपस्थित होते. याशिवाय प्र-कुलगुरू प्रा. एस.टी. इंगळे, राज्यपाल नियुक्त व्य.प. राजेंद्र नन्नवरे, राजभवनद्वारा नियुक्त निरीक्षण समितीचे अध्यक्ष डॉ. संदीप हाडोळे, वित्त समितीचे अध्यक्ष डॉ. कैलास अंभुरे, विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषदेचे सदस्य नितीन झाल्टे, प्रा. शिवाजी पाटील, प्रा. महेंद्रसिंग रघुवंशी, प्रा. पवित्रा पाटील, प्रा. एस.एस. राजपूत, प्रा. जगदीश पाटील, प्रा. सुरेखा पालवे, राजभवन निरीक्षण समिती सदस्य डॉ.विजय कुंभार, डॉ. राजेंद्र माळी,वित्त समिती सदस्य डॉ. राजीव कटारे, डॉ. धनाजी जाधव, डॉ. राजेश लिमसे, कुलसचिव डॉ. विनोद पाटील, वित्त व लेखाधिकारी सीए रवींद्र पाटील, परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक प्रा. योगेश पाटील, आयोजन समितीचे सचिव व विद्यार्थी विकास संचालक डॉ. जयेंद्र लेकुरवाळे आदि उपस्थित होते.

प्रारंभी पाच दिवस चाललेल्या २९ कला प्रकारांचा बंद लिफाफ्यातील निकाल समिती प्रा. अजय पाटील, प्रा.मनोज पाटील व डॉ. जयेंद्र लेकुरवाळे यांनी कुलगुरू प्रा.व्ही.एल. माहेश्वरी यांच्याकडे सुपूर्द केला. राज्यभरातील २४ विद्यापीठांच्या संघांनी सादर केलेल्या विविध कला प्रकारांच्या निकालाची उत्सुकता विद्यार्थ्यांना लागली होती. निकाल जाहीर होण्यासाठी विद्यार्थ्यांमध्ये मोठी उत्कंठता दिसून आली तर जसजसा निकाल जाहीर होत होता तस तसा विद्यार्थ्यांमध्ये उत्साह आणि जल्लोष सुरु होता.

यावेळी बोलतांना जिल्हाधिकारी रोहन घुगे म्हणाले की, महाविद्यालयीन जीवनात वेगवेगळया महोत्सवांमधून उत्साह निर्माण होतो, सहभागी होण्याची संधी मिळते. त्यामुळे विद्यार्थ्यांनी चांगले नागरिक म्हणून समाजात योगदान द्यावे असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. तसेच जिल्हाधिकारी घुगे यावेळी विद्यार्थ्यांचा व्यक्तीमत्वाचे पैलू उलगडले.

मराठी पार्श्वगायक आदर्श शिंदे म्हणाले की,विद्यापीठाच्या परिसरात येताच माझ्या महाविद्यालयीन जीवनाची आठवण झाली. मी सुध्दा अशा युवक महोत्सवांमधून कलाकार म्हणून घडलो. त्यामुळे प्रत्येक विद्यार्थ्याने आपआपल्या कला क्षेत्रात प्रयत्न करून एका उंचीवर पोहचण्याचा प्रयत्न करून आपल्या विद्यापीठाचे आणि शिक्षकांचे, आई वडिलांचे नाव उज्वल करा असा सल्ला त्यांनी दिला. त्यानंतर विद्यार्थ्यांनी केलेल्या फर्माईशवर आदर्श शिंदे यांनी 'आवाज वाढव डीजे तुला, आईची शपथ आहे' गायला सुरुवात करताच विद्यार्थ्यांनी या गाण्यावर ठेका धरला. त्यानंतर दुनियादारी चित्रपटातील गाणे 'देवा तुझ्या गाभाऱ्याला' या गीतावर उपस्थित विद्यार्थी चांगलेच थिरकले.

अध्यक्षीय समारोप करतांना कुलगुरू प्रा.व्ही.एल. माहेश्वरी यांनी विद्यार्थ्यांना उद्देशून सांगितले की, विविध कलांच्या माध्यमातून समाजातील समस्या मांडल्या जावू शकतात. तरूणांमधील उर्जेला योग्य मार्गदर्शन मिळाले तर ते उच्च स्थानावर पोहचू शकतात. या स्पर्धेतून पराभूत कोणीही नाही, यामध्ये 'विनर व लर्नर' असल्याचे सांगितले. पुढे बोलतांना त्यांनी सांगितले की, भारतातील युवाशक्ती ज्ञान, विज्ञान, तंत्रज्ञान, परिश्रम आणि संशोधन या गुणांच्या जोरावरच भारत विकसित राष्ट्र होवू शकेल असा आशावाद त्यांनी व्यक्त केला. विद्यार्थ्यांनी या स्पर्धेतून परततांना राष्ट्र प्रथम व मी प्रामाणिक पणे काम करीन हे दोन विचारांची शिदोरी सोबत घेऊन जावी असे सांगितले.

राजभवन निरीक्षण समितीचे अध्यक्ष संदीप हाडोळे,वित्त समितीचे अध्यक्ष कैलास अंभुरे व विद्यार्थी विकास संचालकांच्या वतीने अमरावतीविद्यापीठातील डॉ. राजीव बोरकर यांनी मनोगत व्यक्त करून इंद्रधनुष्य महोत्सवाच्या आयोजन व नियोजन बाबत समाधान व्यक्त करत विद्यापीठाचे कौतुक केले. यामहोत्सवात सहभागी संघ व्यवस्थापकांसह समन्वयक, विद्यार्थी विकास संचालकांचा व महोत्सवाच्या आयोजनामध्ये ठळक भूमिका निभावणाऱ्या भोजन व्यवस्था, साऊंड व्यवस्था, मंडप व्यवस्था व माध्यमांचा प्रातिनिधिक तसेच विद्यार्थी विकास संचालक डॉ. जयेंद्र लेकुरवाळे यांचा देखील सत्कार करण्यात आला.

विद्यार्थी विकास संचालक डॉ. जयेंद्र लेकुरवाळे यांनी अहवाल वाचन करून इंद्रधनुष्य युवक महोत्सवाचा आढावा घेतला. युवक महोत्सव संदर्भात सहभागी विद्यार्थ्यांमधून मुंबई विद्यापीठाचे विद्यार्थी वैष्णव पाटील, गोंडवाना विद्यापीठातील श्रुती निकोरे तर संघ

व्यवस्थापकांचे प्रतिनिधी म्हणून सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठातील डॉ. योगेश बोराटे यांनी मनोगत व्यक्त केले. सूत्रसंचालन डॉ. योगेश महाले, डॉ. रफिक शेख, डॉ. वीणा महाजन, खेमराज पाटील यांनी केले. आभार विद्यापीठाचे कुलसचिव डॉ.विनोद पाटील यांनी मानले. या महोत्सवाची सांगता वंदे मातरम गीताने झाली.

समारोपाप्रसंगी विविध प्राधिकरणाचे सदस्य, अधिष्ठाता प्रा. अनिल डोंगरे, प्रा. साहेबराव भुकन, अधिसभा सदस्य स्वप्नाली महाजन, दीपक पाटील, भानुदास येवलेकर, केदारनाथ कवडीवाले, अमोल मराठे, नेहा जोशी, मिनाक्षी निकम, प्रा. कविता महाजन, प्रा.विशाल पराते, प्रा.किर्ती कमळजा, प्रा. संदीप नेरकर, डॉ. धिरज वैष्णव, प्रा. मंदा गावीत, प्रा. सखाराम पाटील, प्रा. एच.एम. पाटील, डॉ.ऋषीकेश चित्तमवार, वैशाली वराडे, विद्यापीठ प्रशाळेचे संचालक, शिक्षक, अधिकारी व शिक्षकेत्तर कर्मचारी, विद्यापीठाच्या विविध प्राधिकरणाचे सदस्य, विविध समितीचे सदस्य, सहभागी विद्यापीठांचे विद्यार्थी व संघ व्यवस्थापक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

असा आहे विविध कला प्रकारांचा निकाल : **१) शोभायात्रा-** महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक (प्रथम), शिवाजी विद्यापीठ,कोल्हापूर (द्वितीय), कर्मवीर भाऊराव पाटील विद्यापीठ, सातारा (तृतीय), **२) वाङ्मयीन कला विभाग –** १) वक्तृत्व स्पर्धा - शिवाजी विद्यापीठ,कोल्हापूर (प्रथम), मुंबई विद्यापीठ, मुंबई (द्वितीय), संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती (तृतीय) २) वादविवाद स्पर्धा :- शिवाजी विद्यापीठ,कोल्हापूर (प्रथम), मुंबई विद्यापीठ, मुंबई (द्वितीय), स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड (तृतीय), क) प्रश्नमंजुषा : संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती(प्रथम), मुंबई विद्यापीठ, मुंबई (द्वितीय), सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे (तृतीय) **३) ललित कला विभाग** १) स्थळ चित्र:- कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव (प्रथम), महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक (द्वितीय),संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती (तृतीय), २) चिकटकला:- शिवाजी विद्यापीठ,कोल्हापूर (प्रथम), संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती (द्वितीय), एस.एन.डी.टी. महिला विद्यापीठ, मुंबई (तृतीय), ३) पोस्टरमेकींग :- कवि कुलगुरू कालिदास संस्कृत विद्यापीठ, रामटेक (प्रथम), पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर विद्यापीठ, सोलापूर (द्वितीय), मुंबई विद्यापीठ, मुंबई (तृतीय), ४) माती कला:- सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे (प्रथम), कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव (द्वितीय), यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक व महाराष्ट्र प्राणी व मत्स विज्ञान विद्यापीठ, नागपूर (तृतीय विभागून), ५) व्यंगचित्र:- पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर विद्यापीठ, सोलापूर (प्रथम), शिवाजी विद्यापीठ,कोल्हापूर (द्वितीय), कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव (तृतीय), ६) रांगोळी :- डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, छत्रपती संभाजीनगर (प्रथम), पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर विद्यापीठ, सोलापूर (द्वितीय), संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती (तृतीय), ७) स्थळ छायाचित्र :- पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर विद्यापीठ, सोलापूर (प्रथम) मुंबई विद्यापीठ, मुंबई (द्वितीय), राष्ट्र संत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ, नागपूर (तृतीय), ८) इंस्टॉलेशन :- महाराष्ट्र प्राणी व मत्स विज्ञान विद्यापीठ, नागपूर (प्रथम), कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव (द्वितीय), एच.एस.एन.सी. विद्यापीठ, मुंबई (तृतीय), **४) संगीत विभाग -** १) भारतीय शास्त्रीय गायन (भारतीय / कर्नाटकी) :- मुंबई विद्यापीठ, मुंबई (प्रथम) सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे (द्वितीय), शिवाजी विद्यापीठ,कोल्हापूर (तृतीय), २) भारतीय शास्त्रीय वाद्य संगीत (तालवाद्य) - शिवाजी विद्यापीठ,कोल्हापूर (प्रथम), स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड (द्वितीय), डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, छत्रपती संभाजीनगर (तृतीय), ३) भारतीय शास्त्रीय वाद्य संगीत- कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव (प्रथम), मुंबई विद्यापीठ, मुंबई (द्वितीय), संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती (तृतीय), ४) नाट्यसंगीत :- शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर (प्रथम) , मुंबई विद्यापीठ, मुंबई (द्वितीय), सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे (तृतीय) , ५) भारतीय सुगम संगीत :- शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर (प्रथम) , सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे (द्वितीय), कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव (तृतीय), ६) भारतीय समुहगान :- मुंबई विद्यापीठ, मुंबई (प्रथम), एस.एन.डी.टी. महिला विद्यापीठ, मुंबई (द्वितीय), शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर (तृतीय), ७) भारतीय लोकसंगीत वाद्यवृंद - शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर (प्रथम), मुंबई विद्यापीठ, मुंबई (द्वितीय), कर्मवीर भाऊराव पाटील विद्यापीठ, सातारा (तृतीय), ८) पाश्चिमात्य गायन- मुंबई विद्यापीठ, मुंबई (प्रथम), शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर (द्वितीय), कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव (तृतीय) ९) पाश्चिमात्य वाद्यसंगीत- मुंबई विद्यापीठ, मुंबई (प्रथम), सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे (द्वितीय), संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती (तृतीय), १०) पाश्चिमात्य समूहगान : मुंबई विद्यापीठ, मुंबई (प्रथम), शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर (द्वितीय), एस.एन.डी.टी. महिला विद्यापीठ, मुंबई (तृतीय)

**५) नृत्य विभाग** १) भारतीय शास्त्रीय नृत्य :- राष्ट्र संत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ, नागपूर(प्रथम), मुंबई विद्यापीठ, मुंबई (द्वितीय) एच.एस.एन.सी. विद्यापीठ, मुंबई (तृतीय), २) भारतीय लोकसमूह नृत्य:- संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती (प्रथम) : मुंबई विद्यापीठ, मुंबई (द्वितीय), शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर आणि स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड (तृतीय विभागून) **६) रंगमंचीय कला विभाग** १) नक्कल- कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव (प्रथम) पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर विद्यापीठ, सोलापूर (द्वितीय) डॉ.बाबासाहेब सावंत कोकण कृषी विद्यापीठ, दापोली (तृतीय) २) एकांकिका - सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे (प्रथम), मुंबई विद्यापीठ, मुंबई (द्वितीय), शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर (तृतीय) ३) प्रहसन :- कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव (प्रथम), स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड (द्वितीय) पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर विद्यापीठ, सोलापूर (तृतीय), ३) मुक अभिनय :- मुंबई विद्यापीठ, मुंबई (प्रथम), महात्मा फुले कृषी विद्यापीठ, राहुरी (द्वितीय) एस.एन.डी.टी. महिला विद्यापीठ, मुंबई (तृतीय) **७) लघु चित्रपट -** डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, छत्रपती संभाजीनगर (प्रथम), शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर (द्वितीय), यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक (तृतीय)

**कला प्रकार निहाय सर्वसाधारण विजेते :-**

१) संगीत – श्रीमती प्रेमा वेळुकर संगीत फिरते चषक (डॉ. राजन वेळुकर पुरस्कृत) मुंबई विद्यापीठ, मुंबई

२) नृत्य – एन गणेश अय्यर नृत्य फिरते चषक (श्री चंद्रा गणेश पुरस्कृत) मुंबई विद्यापीठ, मुंबई

३) वाङ्मयीन कला प्रकार – एम.जी. रांगणेकर वाङ्मयीनफिरते चषक (श्रीमती उषा ठक्कर व विनायक दळवी पुरस्कृत) मुंबई विद्यापीठ, मुंबई

४) रंगमंचीय कला प्रकार - विनय आपटे रंगमंचीय फिरते चषक (श्री.विनायक दळवी पुरस्कृत) कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव व मुंबई विद्यापीठ, मुंबई (विभागून)

५) ललित कला - एच.एच. जगदगुरू श्री. चंद्रशेखरेंद्र सरस्वती ललित कलाफिरते चषक (श्री. टी.एस. सुंदरराजन पुरस्कृत) पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर विद्यापीठ, सोलापूर

---

जा.क्र.:-कबचौउमवि/१६/ई-मेल/बातमी/२०२५ दिनांक: ९ नोव्हेंबर, २०२५

प्रति,

मा.संपादक/प्रतिनिधी,

कृपया, उपरोक्त बातमीस आपल्या लोकप्रिय दैनिकातून प्रसिध्द करावी, ही विनंती.

आपला विश्वासू

जनसंपर्क अधिकारी करीता